# बोदवड महविद्यालयात रोजगार केंद्रात नावनोंदणी मेळावा संपन्न
# सुमारे 500 विद्यार्थ्यांचा सहभाग, जिल्हा रोजगार केंद्राचे सहकार्य.

कला वाणिज्य व विज्ञान बोदवड महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल समिती अंतर्गत विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होंण्यासाठी जिल्हा रोजगार विनिमय केंद्रातर्फ महाविद्यालयात नावनोंदणी मेळाव्याचे आयोजन दि. 25 जुलै 2018 रोजी महाविद्यालयाच्या प्रागंणात करण्यात आले होते. या मेळाव्यात सुमारे 500 विद्यार्थ्यांनी आपली नावे नोंदविली.

मेळाव्याचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी यांनी केले.या प्रसंगी जिल्हा रोजगार विनिमय केंद्राचे अधिकारी श्री चित्ते उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य अरविंद चौधरी यांनी रोजगार विनिमय केंदात नाव नोंदणीचे महत्व स्पष्ट करुन शासनाने स्वयंरोजगार व लघुउद्योगासाठी अनेक योजना उपलब्ध केलेल्या आहेत. शासनाची विविध कार्यालये नवौद्योजकांना मार्गद्रशन व प्रशिक्षण देत असते त्याचा लाभ विद्यार्थ्यानी घ्यावा महविद्यलयाच्या वतीने विद्यार्थ्यांना नेहमीच सहकार्य राहिल.

मेळाव्यानंतर रोजगार विनिमय केंद्रात नाव नोंदणी केलल्या विद्यार्थ्याना प्रमाणपत्रांचे वाटप प्राचार्य अरविंद चौधरी यांचे हस्ते प्रदान करण्यात आली.

सदर मेळावा यशस्वि करण्यासाठी समिती अध्यक्ष प्रा.डॉ. पी.एस.महाले, डॉ.पी.एन. पाटील, डॉ.गिता पाटील, डॉ.रुपेश मोरे, श्री समिर पाटील, श्री जितेम्द्र शर्मा यांनी सहकार्य केले. या उपक्रमास विद्यार्थ्यानी प्रचंड प्रतिसाद दिला.



